# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 11/01/2024 (गुरूवार) सायंकाळ

---

## फसवणुक

**पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत किसान चौक रामटेक येथे दिनांक ०२/०१/२०२४ ते दिनांक ०३/०१/२०२४ चे १३.०० वा. ते ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— माधव देवराव फिरगवार वय ५० वर्ष, रा. शास्त्री वार्ड रामटेक यांचे दिनांक ०२/०१/२०२४ व दिनांक ०३/०१/२०२४ रोजी कोणीतरी अनोळखी व्यक्तीने एक्सीस बॅंक किसान चौक रामटेक येथील ए. टी. एम मशिन मधुन फिर्यादीचा कार्ड बदलवुन फिर्यादीची फसवणुक करुन व फिर्यादीचा ए. टी. एम कार्डचा वापर करुन युनियन खात्या मधुन टप्प्या टप्प्या मध्ये एकुण १,४५,०००/—रू. काढुन घेतले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी पोलीस नायक अमोल इंगोले यांनी भेट दिली असुन तसेच अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक अमोल इंगोले मो. नं. ८८३०६२१२३३ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**पो.स्टे. कोंढाळी** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावर मौजा बिहालगोंदी येथे दिनांक ०९/०१/२०२४ चे १५.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— अभिशेक संजय मरस्कोल्हे, वय २६ वर्ष रा. बिहालगोंदि याची दिनांक ०९/०१/२०२४ रोजीचे १५.०० वा. ते १६.०० वा. दरम्यान मोटरसायकल क्र. एम एच— ४०/ सी एल —०२६८ किंमती अंदाजे ३०,०००/— रू. ही घरासमोर उभी केलेली फिर्यादीची मोटरसायकल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कोंढाळी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर घटनास्थळी ठाणेदार पंकज वाघोडे यांनी भेट दिली असुन तसेच अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार कोल्हे मो. क्र. ९०४९८८५२१३ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**